क्रमांक :१२३१९/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ५ ऑगस्ट, २०२५

**संदर्भ :** १) या सचिवालयाचे ज्ञापन क्र.१२१४३/क-१, दिनांक १९ मार्च, २०१६

२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शा.नि.क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दि.१/१२/२०१६

३) या सचिवालयाचे ज्ञापन क्र.१९६१९/क-१, दिनांक १९ जुलै, २०१८

४) या सचिवालयाचे ज्ञापन क्र.२२४३/क-१, दिनांक १० फेब्रुवारी, २०२१

५) या सचिवालयाचे ज्ञापन क्र.१२८७२/क-१, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२

**: : ज्ञा प न : :**

मा.मंडळाच्या निदेशानुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील विविध कक्षात आवश्यक ती साधनसामुग्री खरेदी करताना त्यात एकसुत्रीपणा राहण्याच्या दृष्टीने तसेच खरेदी प्रक्रिया पारदर्शक (Transparent) व नियमानुकूल राहून जलदगतीने पूर्ण होण्याच्या उद्देशाने संदर्भ क्र.५ वरील ज्ञापनान्वये "खरेदी समिती (Purchase Committee)" गठीत करण्यात आलेली होती. सदरहू समिती या ज्ञापनान्वये विसर्जित करण्यात येत असून संदर्भ क्रमांक २ वरील शासन निर्णयान्वये नव्याने 'खरेदी समिती' गठीत करण्यात येत आहे. या समितीची रचना खालीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | श्री.जि.म. भोळे, सचिव-१ | अध्यक्ष |
| २. | श्री.ना. रा. थिटे, सह सचिव | सदस्य |
| ३. | श्री.र. ग. जगदाळे, उप सचिव | सदस्य सचिव |
| ४. | उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी | सदस्य |
| ५. | 'ग-१' व 'ग-२' कक्षाचे अधिकारी (सह सचिव/उप सचिव/अवर सचिव) | सदस्य |
| ६. | संबंधित खरेदीदार विभागाचा अधिकारी (सह सचिव/उप सचिव/अवर सचिव) | सदस्य |
| ७. | श्री.अ.अ.सर्वणकर, पद्धती विश्लेषक | निमंत्रित |
| ८. | कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी | निमंत्रित |
| | (या सचिवालयातील कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी या पदावर लेखा व कोषागारे संचालनालयातील अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे उक्त पदावरील अधिकाऱ्याचा निमंत्रित म्हणून समावेश करण्यात आला आहे.) | |

या सचिवालयाच्या कार्यालयीन खरेदीकरीता उपरोक्तप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या समितीस सहाय्य करण्याकरीता "ग-१" कक्षाचे कक्ष अधिकारी व सहायक कक्ष अधिकारी तसेच "ग-२" कक्षाचे कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक व सहायक मालमत्ता व्यवस्थापक यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

उपरोक्त "खरेदी समिती (Purchase committee)" संदर्भ क्र.२ वरील शासन निर्णयातील कार्यपद्धती तसेच वित्तीय नियम विचारात घेवून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसांच्या कालावधीत प्रस्तावांची छाननी करुन अभिप्रायासह प्रस्ताव संबंधित कक्षाकडे पाठवतील.

खरेदी समितीच्या अभिप्रायानुसार समितीच्या शिफारशी संबंधित कक्ष खालील प्रपत्रात प्रधान सचिव/ सचिव यांच्याकडे पाठवतील. प्रस्तावास योग्य त्या सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत मान्यता मिळाल्यानंतर निधी उपलब्धतेसंदर्भातील कार्यवाही "क-४" (अर्थसंकल्प) कक्षामार्फत प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ७ दिवसात करण्यात येईल.

| **अ.क्र.** | **संबंधीत कक्षाने खरेदी समितीकडे प्रस्ताव पाठविल्याचा दिनांक** | **खरेदी समितीने प्रस्ताव विचारात घेतल्याचा दिनांक** | **शिफारशीसह समितीने संबंधित कक्षाकडे प्रस्ताव पाठविल्याचा दिनांक** | **प्रधान सचिव/सचिव यांच्याकडे संबंधित कक्षाने शिफारशीसह प्रस्ताव पाठविल्याचा दिनांक** | **प्रस्तावास सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिल्याचा दिनांक** | **क-४ कक्षाने निधी उपलब्ध करणे/न करणे याबाबत केलेल्या कार्यवाहीचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |

तसेच प्रस्तावाची सद्य:स्थिती संबंधित कक्षाने वेगळया टिप्पणीद्वारे प्रधान सचिव/सचिवांना दर ८ दिवसांनी अवगत करणे बंधनकारक राहील. सक्षम प्राधिकारी याबाबत मा.पीठासीन अधिकारी यांना तातडीने अवगत करतील.

आदेशानुसार,

**( सुभाष नलावडे )**

सह सचिव (स) तथा विशेष कार्य अधिकारी

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय



म.वि.स./क-५(आस्थापना)

**प्रति,**

१) श्री.जि.म.भोळे, सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

२) श्री.ना.रा. थिटे, सह सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

३) श्री.र.ग.जगदाळे, उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

४) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

५) श्री.अ.अ.सर्वणकर, पद्धती विश्लेषक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

६) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी

**प्रतिलिपी** :

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

४) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

५) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

६) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

८) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

९) कक्ष अधिकारी, 'ग-१' (सामान्य) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१०) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

११) 'क-४' (अर्थसंकल्प) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१२) या सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष

१३) सार्वजनिक बांधकाम विभाग (स्थापत्य व विद्युत) यांचे अधिकारी, विधान भवन, मुंबई

१४) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१५) निवड नस्ती

म.वि.स./कं-१ (आस्थापना)